शनिवार, दि. १६ मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २५४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### संजय राऊत यांच्या वक्तव्याविरोधात जालन्यात युवा सेनेचे तीव्र आंदोलन

## सावरकर चौकात जोडे मारो आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** खासदार संजय राऊत यांनी युवकांबाबत केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ आज शहरातील सावरकर चौकात युवा सेनेच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात आले. युवा सेनेच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत खासदार संजय राऊत यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन केले. या आंदोलनामुळे काही काळ परिसरात राजकीय वातावरण तापल्याचे चित्र पाहायला मिळाले.

युवा सेना मराठवाडा सचिव अभिमन्यू खोतकर यांच्या आदेशानुसार हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते. आंदोलनात सहभागी झालेल्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी संजय राऊत यांनी युवकांविषयी केलेले वक्तव्य अत्यंत आक्षेपार्ह असून, त्यामुळे संपूर्ण युवक वर्गाचा अपमान झाल्याचा आरोप केला. राज्य सरकारने या वक्तव्याची गंभीर दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी यावेळी केली.

सावरकर चौक परिसरात मोठ्या संख्येने जमलेल्या युवा सेनेच्या कार्यकर्त्यांनी ''युवकांचा अपमान सहन केला जाणार नाही'', ''संजय राऊत माफी मागा'' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. आंदोलनादरम्यान काही कार्यकर्त्यांनी संजय राऊत यांच्या प्रतिमेला जोडे मारत निषेध नोंदवला. यावेळी आंदोलनकर्त्यांनी ''रात्री कोणत्या नशेत राहतात, याची तपासणी करावी,'' अशी मागणीही केली. आंदोलनात सहभागी झालेल्या पदाधिकाऱ्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, युवकांबाबत अवमानकारक भाषा वापरणाऱ्या नेत्यांविरोधात युवा सेना भविष्यात आणखी तीव्र आंदोलन छेडेल. युवक हा देशाचा कणा असून त्यांच्याबद्दल अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्यांना जनतेसमोर उत्तर द्यावे लागेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.



या आंदोलनात विरोधी पक्षनेते कमले खरे, युवा सेना लोकसभा अध्यक्ष गणेश मोहिते, विधानसभा अध्यक्ष महादेव वाघ, युवा सेना उपतालुकाप्रमुख प्रमोद वाघमारे, तालुका सरचिटणीस रामकिसन काळदे यांच्यासह पिटर खंदारे, कुणाल जाधव, बंडूभाऊ केळकर, जनार्दन गिराम, भागवत गिराम, गोपाल डोंगरे, सुहास लकडे, नितीन निर्मळ, चैतन कोठेवाले, पप्पू मोहिते आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले. आंदोलन शांततेत पार पडले असले तरी आगामी काळात या वक्तव्यावरून राजकीय वाद आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## प्रभाग ७ चा सर्वांगीण विकास आणि जनसेवा हेच माझे मुख्य ध्येय - नगरसेवक तौसीफ शेख

### नाल्यांवरील सिमेंटचे ढापे आणि स्वच्छतेच्या कामांमुळे नागरिकांना मिळाला मोठा दिलासा

**परतूर । प्रतिनिधी -** ''जनतेने विश्वासाने दिलेली सत्ता ही केवळ खुर्ची नसून ती नागरिकांच्या सेवेची संधी आहे. प्रभाग क्रमांक ७ मधील प्रत्येक नागरिकाला मूलभूत सुविधा पुरवणे आणि त्यांच्या अडीअडचणीला धावून जाणे हे माझे कर्तव्य आहे,'' असे ठाम प्रतिपादन नगरसेवक तौसीफ शेख यांनी केले आहे. नाल्यांवर बसवले सिमेंटचे ढापे प्रभागातील नाल्यांमध्ये कचरा अडकून पाणी साचण्याच्या आणि दुर्गंधी पसरण्याच्या मोठ्या समस्येवर तौसीफ शेख यांनी कायमस्वरूपी तोडगा काढला आहे. ज्या नाल्यांमध्ये वारंवार कचरा अडकत होता, तिथे त्यांनी नियोजनातून सिमेंटचे मजबूत ढापे टाकून दिले आहेत. यामुळे कचरा नाल्यात जाणे थांबले असून सांडपाण्याचा निचरा सुरळीत होत आहे. या कामाचे प्रभागातील नागरिकांकडून विशेष कौतुक होत आहे.रस्ते, नाली आणि साफसफाई यांसारख्या मूलभूत गरजांसाठी तौसीफ शेख हे एनी टाईम रस्त्यावर उतरून काम करताना दिसतात. ''नागरिकांनी मला ज्या विश्वासाने निवडून दिले, त्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. प्रभागातील नागरिकांच्या सुख-दुखात आणिअडीअडचणीला मी रात्री-अपरात्री कधीही धावून जाण्यास तयार आहे. माझ्या कामाची ओळख ही



केवळ शब्दांनी नाही, तर प्रत्यक्ष जमिनीवर केलेल्या विकासकामांतूनच दिसेल,'' असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. प्रभागातील रस्त्यांची नियमित साफसफाई आणि सांडपाण्याची योग्य व्यवस्था याकडे शेख यांचे बारीक लक्ष असते. लोकप्रतिनिधी कसा असावा, याचा एक आदर्श त्यांनी आपल्या कार्यतत्परतेतून घालून दिला आहे. नागरिकांच्या तक्रारींची वाट न पाहता स्वतःहून कामाचा आढावा घेण्याच्या त्यांच्या या कार्यशैलीमुळे प्रभाग क्रमांक ७ मध्ये समाधानाचे वातावरण आहे.

### मनपाची अतिक्रमणमुक्त मोहिम सुरुच

## सात दिवसांत १४८ अतिक्रमणे हटवली

**जालना । प्रतिनिधी -** शहराला अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महानगर पालिका प्रशासनाने हाती घेतलेली विशेष धडक मोहीम सातव्या दिवशीही अत्यंत आक्रमक पद्धतीने सुरू ठेवली. स्वच्छतेचे प्रश्न गंभीर बनले होते. त्यामुळे प्रशासनाने आता कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाईचा मार्ग स्वीकारला आहे. आजच्या कारवाईत विशेषतः अवैध चिकन

गुरुवार, १५ मे रोजी प्रशासनाने नूतन वसाहत, अंबड चौफुली आणि घाटी रोड परिसरात मोठी कारवाई करत अवैध चिकन-मटण विक्रीची १३ दुकाने हटवली, तर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणखी २ दुकानांना सील ठोकण्यात आले. गेल्या सात दिवसांत मनपाने शहरातील विविध भागांमधून तब्बल १४८ अतिक्रमणे हटवून प्रशासनाच्या कठोर भूमिकेचा स्पष्ट संदेश दिला आहे.



महानगरपालिकेने ११ मेपासून शहरात विशेष अतिक्रमण निर्मूलन मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत मुख्य रस्ते, बाजारपेठा, चौक तसेच भूमिगत गटारांच्या मार्गांवर अडथळा ठरणारे दुकानांचे ओटे, पत्र्याचे शेड, तात्पुरती बांधकामे आणि अनधिकृत अतिक्रमणे हटवली जात आहेत. अनेक वर्षांपासून रस्त्यांवर वाढलेल्या अतिक्रमणांमुळे वाहतूक कोंडी, नागरिकांची गैरसोय आणि मटण विक्री व्यवसायांवर प्रशासनाने लक्ष केंद्रित केले. निवासी परिसर आणि मुख्य मार्गालगत उभारण्यात आलेल्या अनेक दुकानांमुळे दुर्गंधी, अस्वच्छता आणि वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे सातत्याने येत होत्या. त्यानुसार मनपाच्या पथकाने सकाळपासूनच कारवाई सुरू करत नूतन वसाहत, **पान २ वर**

## 'महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग' या नावाने पत्रव्यवहार करण्याचे आवाहन

जालना,दि.१५(जिमाका) : महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोग' कार्यालयाच्या नावात 'महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग' असा बदल केला आहे. यापुढे 'महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग' या नावाने पत्रव्यवहार किंवा संपर्क करावा असे महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग, मुंबई येथील सदस्य सचिव एस. एन. पवार यांनी कळविले आहे.

## भाजप महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी केले नवनियुक्त पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांचे स्वागत!

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्याचे नवनियुक्त पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू यांची भाजप महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांनी सदिच्छा भेट घेतली. या प्रसंगी दानवे यांनी संधू यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे जालना जिल्ह्यात अधिकृत स्वागत केले आणि त्यांच्या पुढील यशस्वी कार्यकाळासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

या भेटीदरम्यान जिल्ह्यातील विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. आगामी काळात जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट होईल, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला. तसेच नागरिकांना संपूर्ण सुरक्षित व भयमुक्त वातावरण मिळावे, यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध राहील, अशी अपेक्षा भाजप पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. पोलीस प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील समन्वय अधिक दृढ करण्यावरही या बैठकीत भर देण्यात आला.

प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

या सदिच्छा भेट दरम्यान. गोवर्धन कोल्हे, . राजेश जोशी आणि तालुकाध्यक्ष . संजय डोंगरे यांचा समावेश होता. या सर्वांनी नवनियुक्त पोलीस अधीक्षकांचे स्वागत करून जिल्ह्यातील शांतता व सुव्यवस्थेसाठी सहकार्याचे आश्वासन दिले.



### खाकी वर्दीतील संवेदनशील अधिकारी आता जालन्यात

## विक्रम साळी अप्पर पोलीस अधीक्षकपदी!

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र पोलीस दलातील एक अत्यंत शिस्तप्रिय, कर्तव्यदक्ष आणि संवेदनशील अधिकारी अशी ओळख असलेले विक्रम साळी यांची जालना जिल्ह्याचे नवीन अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. गृह विभागाच्या वतीने नुकत्याच जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार ही नियुक्ती झाली आहे. यापूर्वी ते छत्रपती संभाजीनगर येथील राज्य राखीव पोलीस दलात समादेशक आणि पोलीस भरती प्रमुख म्हणून कार्यरत होते.

विक्रम साळी हे महाराष्ट्र पोलीस दलातील एक नामांकित आणि तरुण आयपीएस अधिकारी आहेत. आपल्या कडक शिस्तीसोबतच, सर्वसामान्य नागरिक आणि गरजू उमेदवारांबद्दल असलेल्या कमालीच्या संवेदनशीलतेसाठी ते ओळखले जातात. छत्रपती संभाजीनगर येथील राज्य राखीव पोलीस दलात समादेशक म्हणून काम करताना त्यांनी आपल्या कौशल्याची आणि कार्यपद्धतीची एक वेगळी छाप पाडली होती.

विक्रम साळी यांचे पोलीस भरती प्रक्रियेतील योगदान अत्यंत वाखाणण्याजोगे राहिले आहे.

पारदर्शक कारभार: पोलीस भरती दरम्यान होणारे गैरप्रकार, भ्रष्टाचार आणि डमी उमेदवारांना रोखण्यासाठी त्यांनी अत्यंत कडक पावले उचलली होती. संपूर्ण भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक आणि गुणवत्तेच्या आधारावर पार पाडण्यात त्यांचा मोठा हात होता.

उमेदवारांना मार्गदर्शन: भरतीसाठी येणाऱ्या महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील तरुणांना योग्य दिशा दाखवणे, त्यांना शिस्तीचे धडे देणे आणि त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवण्यासाठी ते स्वतः मैदानावर उतरून मार्गदर्शन करत असत.

**खाकी वर्दीतील संवेदनशील माणूसः सोशल मीडियावर प्रचंड लोकप्रिय**

केवळ कडक पोलीस अधिकारी अशीच त्यांची ओळख नाही, तर त्यांच्यातील सामाजिक जाणीव आणि संवेदनशीलतेमुळे ते राज्यातील तरुणांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत.

गरजू उमेदवारांना मदतीचा हात: पोलीस भरतीसाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून, ग्रामीण भागातून आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून येणाऱ्या उमेदवारांच्या अडचणी त्यांनी जवळून अनुभवल्या.

शूज आणि फळांचे वाटपः भरती प्रक्रियेदरम्यान अनेक तरुणांकडे धावण्यासाठी साधे शूजही नसायचे. ही बाब लक्षात घेऊन साळी यांनी



अशा गरजू उमेदवारांना स्वतःहून शूज आणि उन्हातान्हात धावणाऱ्या तरुणांच्या ऊर्जेसाठी फळांचे वाटप केले. त्यांच्या या अनोख्या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक झाले.

याच संवेदनशील कार्यामुळे विक्रम साळी हे सोशल मीडियावर आणि विशेषतः पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत.

जालना जिल्हा हा राजकीय आणि सामाजिक दृष्ट्या अत्यंत संवेदनशील मानला जातो. अशा परिस्थितीत विक्रम साळी यांच्यासारख्या शिस्तप्रिय आणि गतिमान अधिकाऱ्याची अप्पर पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती झाल्याने, जालन्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील अवैध धंदे, गुन्हेगारी आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांवर साळी आपल्या खास शैलीत कसा अंकुश लावतात, याकडे आता जालन्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### बुलेटच्या कर्णकर्कश आवाजाला पोलिसांचा रोलर क्रश

## १०२ मॉडीफाईड सायलेन्सर्स भरचौकात केले नष्ट!

**जालना । प्रतिनिधी -** रस्त्यावरून जाताना कानठळ्या बसवणारा आवाज करणाऱ्या आणि फटाक्यांसारखे आवाज काढून शांतता भंग करणाऱ्या बुलेट चालकांना जालना पोलिसांनी आज अत्यंत कडक आणि जाहीर संदेश दिला आहे. जालना जिल्हा पोलीस अधीक्षक मा. श्री. तेघबीर सिंह संधू यांच्या आदेशानुसार, मागील दोन वर्षांत विशेष मोहिमेदरम्यान जप्त करण्यात आलेले तब्बल १०२ मॉडीफाईड (सुधारित) सायलेन्सर्स आज, शुक्रवार दिनांक १५ मे २०२६ रोजी भरचौकात थेट रोलर फिरवून नष्ट करण्यात आले. पोलिसांच्या या धडक कारवाईचे जालन्यातील त्रस्त नागरिकांनी, विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि पालकांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले आहे.

दोन वर्षांची मोठी कारवाई; पोलीस अधीक्षकांचा थेट निशाणा

जालना शहरात बुलेट वाहनांना कंपनीचे मूळ सायलेन्सर बदलून, नियमबाह्य पद्धतीने मोठ्या आवाजाचे सायलेन्सर लावण्याचे फॅड वाढले होते. या कर्णकर्कश **पान २ वर**



संपादकीय पान

## नागरिकांच्या आरोग्याचा घटनात्मक हक्क की व्यावसायिक स्वैराचार?

हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाने दिलेला ''निवासी क्षेत्रापासून ५०० मीटरच्या आत पोल्ट्री फार्म चालवता येणार नाही'' हा निर्णय केवळ एका कुक्कुटपालन केंद्रापुरता मर्यादित नाही; तर तो देशातील वाढत्या शहरीकरण, पर्यावरणीय असंतुलन आणि नागरिकांच्या आरोग्याच्या हक्कावर भाष्य करणारा दूरगामी निर्णय ठरतो. ने दिलेल्या या निकालाने एक स्पष्ट संदेश दिला आहे ''व्यवसाय महत्त्वाचा असला, तरी नागरिकांचे जीवन आणि आरोग्य त्याहून अधिक महत्त्वाचे आहे.'' भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत ''जीवनाचा अधिकार'' हा केवळ जिवंत राहण्यापुरता मर्यादित नसून, स्वच्छ हवा, निरोगी वातावरण आणि सुरक्षित परिसरात जगण्याचाही अधिकार आहे, हे न्यायालयाने पुन्हा अधोरेखित केले. आज अनेक शहरांमध्ये आणि गावांमध्ये निवासी वस्त्यांच्या अगदी शेजारी पोल्ट्री फार्म, डेअरी, कचरा डेपो किंवा प्रदूषणकारी उद्योग उभे राहत आहेत. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे किंवा राजकीय दबावामुळे नागरिकांच्या आरोग्याशी थेट तडजोड होत आहे. या प्रकरणात विशेष बाब म्हणजे, प्रतिवादीकडे ग्रामपंचायतीचे ना-हरकत प्रमाणपत्र होते. परंतु न्यायालयाने स्पष्ट केले की, केवळ कागदी परवानगी म्हणजे कायदेशीर आणि नैतिक वैधता नव्हे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी परवाने देताना नागरिकांच्या आरोग्यावर होणारा परिणाम, पर्यावरणीय परिणाम आणि भविष्यातील सार्वजनिक धोके यांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. अनेकदा ग्रामपंचायत किंवा नगरपालिका ''महसूल'' आणि ''स्थानिक दबाव'' यांच्या पलीकडे विचार करत नाहीत. परिणामी, सामान्य नागरिकांना दुर्गंधी, डास, संसर्गजन्य आजार आणि प्रदूषणाचा सामना करावा लागतो. यांनी व्यक्त केलेले मत अत्यंत महत्त्वाचे आहे. जालना सारख्या झपाट्याने वाढणाऱ्या शहरांमध्ये नियोजनाचा अभाव स्पष्ट दिसतो. शहरांच्या सीमेवर किंवा नव्या वसाहतींच्या आसपास अनधिकृत पोल्ट्री फार्म, स्क्रॅप डेपो, रासायनिक गोदामे आणि इतर प्रदूषणकारी व्यवसाय वाढत आहेत. हे केवळ दुर्गंधीपुरते मर्यादित नसून, भविष्यात सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण करू शकते. विशेष म्हणजे, भारतात '' '' वर भर दिला जात असताना '' '' कडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. रोजगार निर्मिती आणि व्यवसाय वाढ आवश्यक असली तरी ती नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या किंमतीवर होऊ शकत नाही. प्रशासनाने उद्योग आणि नागरिक यांच्यात समतोल राखणे गरजेचे आहे. अन्यथा विकासाच्या नावाखाली शहरांचे आरोग्य धोक्यात येईल. या निकालाचा महाराष्ट्रासह इतर राज्यांनी गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. निवासी क्षेत्रांलगत सुरू असलेल्या व्यवसायांचे पुनर्मूल्यांकन करणे, पर्यावरणीय निकषांचे काटेकोर पालन करणे आणि नागरिकांच्या तक्रारी येण्यापूर्वीच प्रशासनाने स्वतःहून सर्वेक्षण मोहीम राबवणे ही काळाची गरज बनली आहे. अन्यथा न्यायालयीन हस्तक्षेपाशिवाय प्रशासन जागे होणार नाही, अशी धोकादायक परिस्थिती निर्माण होईल. हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचा हा निर्णय केवळ एका पोल्ट्री फार्मवर कारवाई करणारा निकाल नाही; तर तो प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि राजकीय व्यवस्थेला दिलेला घटनात्मक इशारा आहे. विकास हवा, पण तो नागरिकांच्या श्वासावर नाही. स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण हा ''सरकारचा उपकार'' नसून प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे आणि तो अबाधित ठेवण्याची जबाबदारी शासन-प्रशासनावरच आहे.

# भारताच्या संरक्षणासाठी मुंबईत १७ मे रोजी 'श्री राजमातंगी महायज्ञ'

**मुंबई -** जगावर सध्या तिसऱ्या महायुद्धाचे काळे ढग दाटले असताना, केवळ राजकीय किंवा बौद्धिक स्तरावरील प्रयत्न पुरेसे नसून राष्ट्राला आध्यात्मिक अधिष्ठानाची मोठी गरज आहे. याच उदात्त हेतूने, भारताला अभेद्य आध्यात्मिक संरक्षककवच लाभावे आणि देशाची सर्वांगीण प्रगती होऊन पुन्हा एकदा 'रामराज्या'चा उदय व्हावा, या संकल्पपूर्तीसाठी सनातन संस्थेच्या वतीने मुंबईत 'श्री राजमातंगी महायज्ञा'चे आयोजन करण्यात आले आहे. येत्या रविवारी, १७ मे २०२६ रोजी प्रभादेवी येथील श्री सिद्धिविनायक मंदिराच्या पाठीमागे असलेल्या नर्दुल्ला टँक मैदानावर दुपारी ३.३० ते सायं. ७.३० या वेळेत हा यज्ञ सोहळा अत्यंत मंगलमय वातावरणात संपन्न होणार आहे, अशी माहिती सनातन संस्थेचे प्रवक्ता श्री. अभय वर्तक यांनी मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. या वेळी संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ता श्री. चेतन राजहंस, पुरोहित अन् ज्योतिर्विद श्री. श्रेयस पिसोळकर आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाचे नवी मुंबई समन्वयक श्री. कैलास पाटील उपस्थित होते. हा महायज्ञ केवळ धार्मिक विधी नसून तो राष्ट्ररक्षणाचा एक आध्यात्मिक लढा असल्याचे या वेळी अधोरेखित करण्यात आले.

या यज्ञाचे आध्यात्मिक महत्त्व विशद करताना श्री. अभय वर्तक म्हणाले की, आदिशक्ती देवी सतीच्या क्रोधातून प्रकट झालेल्या 'दशमहाविद्यां'मध्ये मातंगीदेवीचे स्थान अनन्यसाधारण आहे. देवी मातंगी ही आदिशक्तीची 'प्रधानमंत्री' म्हणजेच प्रमुख सल्लागार मानली जाते. शत्रूवर विजय मिळवण्यासाठी आणि प्रतिकूल परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी या देवीची उपासना फलदायी ठरते. ऐतिहासिक संदर्भांचा दाखला देत त्यांनी सांगितले की, त्रेतायुगात प्रभू श्रीरामाच्या अवताराच्या वेळीही राजमातंगी देवीचे तत्त्व कार्यरत होते, ज्यामुळे आदर्श रामराज्य स्थापन होऊ शकले. आजच्या काळातही तशाच दैवी शक्तीच्या आशीर्वादाने भारताचे संरक्षण व्हावे, हा या यज्ञामागील मुख्य उद्देश आहे.

या महायज्ञाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे १ हजार वर्षांपूर्वी आक्रमक महंमद गझनीने भग्न केलेल्या सोरटी सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या दिव्य अंशांचे दर्शन ! इतिहासाची साक्ष देणारे हे पवित्र अवशेष याठिकाणी दर्शनासाठी ठेवले जाणार असून भाविकांसाठी ही एक दुर्मिळ संधी असणार आहे असे श्री. चेतन राजहंस म्हणाले. यज्ञाची सुरुवात महासंकल्प, श्री गणेश आवाहन आणि पुण्याहवाचन होणार असून, श्री राजमातंगी देवीच्या मूलमंत्रांनी यज्ञामध्ये आहुती अर्पण केल्या जातील. यज्ञाचे पौरोहित्य इरोड, तामिळनाडू येथील शिवागम विद्यानिधी आगमाचार्य श्री. अरुणकुमार गुरुमूर्ती करतील तर शिवाचार्य श्री. गुरुमूर्ती हे यज्ञाचे मुख्य आचार्य असतील,




असे पुरोहित अन् ज्योतिर्विद श्री. श्रेयस पिसोळकर म्हणाले. या यज्ञाला मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्हयातील अनेक मंदिरांचे विश्वस्त आणि पुजारी सहभागी होणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र मंदिर महासंघाचे नवी मुंबई समन्वयक श्री. कैलास पाटील यांनी दिली.

सनातन संस्थेने आतापर्यंत ७५० हून अधिक यज्ञ-अनुष्ठाने केली आहेत. या यज्ञ सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवर, संत-महंत, राज्य सरकारमधील मंत्री, हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे पदाधिकारी, विचारवंत, वकील आणि उद्योजकांसह सुमारे ५ हजार भाविक उपस्थित राहतील. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांनी ज्या मुंबापुरीतून धर्मकार्याचा श्रीगणेशा केला, त्याच नगरीत होणारा हा महायज्ञ राष्ट्रउभारणीच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल ठरेल, असा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. सर्व धर्मप्रेमी हिंदूंनी सहकुटुंब या सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. अभय वर्तक यांनी केले आहे.

### सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी अविष्कार:

# उध्वस्त नाटकाच्या प्रयोगातून अपंग मुलीच्या उपचारासाठी मदतीचा हात

**कल्याण । प्रतिनिधी -** कलेचा वापर केवळ मनोरंजनासाठी न करता तो सामाजिक कल्याणासाठी कसा करता येतो, याचा प्रत्यय कल्याणमध्ये नुकताच पाहायला मिळाला. प्रेरणा फाउंडेशन व हर्ष फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, अमरावती येथील अपंग मुलगी रोहिणी बोम्मावर हिच्या उपचारासाठी निधी उभारण्याच्या उद्देशाने उध्वस्त या नाटकाचा विशेष प्रयोग आयोजित करण्यात आला होता. या प्रयोगातून सामाजिक बांधिलकीचा एक आदर्श संदेश समाजाला देण्यात आला.

नाट्यप्रयोगाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

कल्याण येथील आचार्य प्र. के. अत्रे नाट्यगृहात रविवार, २६ एप्रिल रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत हा प्रयोग पार पडला. प्रेरणा रंगमंच नाट्यमंडळ निर्मित या नाटकाचे लेखन आणि दिग्दर्शन **सौ. प्रेरणा वैभव कुलकर्णी** यांनी केले आहे. नाटकातील कलाकार प्रेरणा कुलकर्णी, रोहन गावकर, वैभव कुलकर्णी, दिव्या गावकर, मंगेश सावंत, हर्षल शिंदे, उर्मिला चौधरी आणि श्रेया शिंदे यांनी आपल्या कसदार अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली.

२५ हजार रुपयांची मदत जाहीर

या उपक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे केवळ निधी संकलनच नव्हे, तर प्रेरणा फाउंडेशनतर्फे रोहिणी बोम्मावर हिच्या उपचारासाठी २५,००० रुपयांची




मदत जाहीर करण्यात आली. तिकीट विक्रीसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

गाण्याच्या अल्बमचे प्रकाशन आणि सत्कार सोहळा

नाट्यप्रयोगासोबतच सौ. प्रेरणा कुलकर्णी यांच्या भूतकाळ आठवणींचा या १०० मराठी गाण्यांच्या अल्बमचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी उध्वस्त नाटकातील सर्व कलाकारांना प्रेरणा फाउंडेशनतर्फे आभारपत्र देऊन गौरविण्यात आले.

मान्यवरांची उपस्थिती

कार्यक्रमाचे आयोजन प्रेरणा फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. प्रेरणा वैभव कुलकर्णी यांनी केले होते. या सोहळ्याला विविध क्षेत्रांतील दिग्गजांनी हजेरी लावली, ज्यामध्ये:

श्री. संजीव जैन (चीफ इन्फॉर्मेशन ऑफिसर, ईंटेग्रेवोन कंपनी)

श्री. अविनाश म्हात्रे (अध्यक्ष, दीनदयाळ कुष्ठरोग संस्था)

श्री. रघुनाथ फडके (माजी संचालक, मुंबई आकाशवाणी)

श्री. धनजी पवार, सौ. माधुरी भोईरकर, श्री. सुरज भोईर (समाजसेवक)

श्री. एन. ए. कदम (कवी व लेखक), श्री. मनीष बोरसे ( सल्लागार)

श्री. दिलीप नारकर, श्री. राजेश भांगे, श्री. मिलिंद आंबेरकर, श्री. मकरंद वढवेकर, सौ. मीनाक्षी अहिरे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सामाजिक कार्यासाठी नाट्यकलेचा असा प्रभावी वापर केल्याबद्दल सर्व स्तरांतून प्रेरणा फाउंडेशन आणि हर्ष फाउंडेशनचे कौतुक होत आहे.

## लोककवी वामनदादा कर्डक



महाराष्ट्राचे लोककवी, शाहीर, आंबेडकरी चळवळीचे बुलंद कार्यकर्ते आणि समाज प्रबोधनकार वामन तबाजी कर्डक यांची १५ मे रोजी २२ वि पुण्यतिथी होती. त्यांच्या २२ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा हा विशेष लेख.

वामनदादा कर्डक यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ रोजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील देशपंडी या छोट्याशा खेड्यात एका गरीब कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव तबाजी तर आईचे नाव सईबाई असे होते. त्यांना एक मोठा भाऊ आणि एक धाकटी बहीण होती. वामनदादा यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना शिक्षण घेता आले नाही. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने उदरनिर्वाहासाठी दादा मिळेल ती कामे करू लागले. जत्रा यात्रांमधून कुस्ती खेळू लागले त्यातून जे पैसे मिळत त्यातून ते घरखर्च चालवू लागले. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांचे लग्न झाले पण त्यांना कौटुंबिक स्वास्थ्य लाभले नाही. त्यांच्या पत्नीचे अकाली निधन झाले पुढे मुलाचेही निधन झाले. इतके मोठे दुःख उराशी बाळगून त्यांनी मुंबई गाठली. मुंबईत त्यांनी गिरणी कामगार म्हणून काम केले. बीडीडी चाळीत त्यांचे वास्तव्य असे तिथेच त्यांची सैनिक समता दल आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांशी ओळख झाली. समता सैनिक दलातर्फे डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या सभेचे आयोजन करण्यात त्यांचा पुढाकार असायचा. वामनदादांना लहानपणापासून गायनाची आवड होती. त्यांना मिळालेली प्रतिभा ही जन्मदत्त देणगी होती. लहानपणापासून गायनाची आवड असलेल्या वामनदादांकडे लेखणी, वाणी आणि संगीत यांचा त्रिवेणी संगम होता. एक दिवस फावल्या वेळेत ते राणीच्या बागेत बसले असताना त्यांनी एका हिंदी चित्रपट गीताचे विडंबन केले. ते गीत त्यांनी राणीच्या बागेतील गर्दीपुढे म्हटले. त्यांचे हे विडंबन गीत उपस्थित लोकांना खूप आवडले. त्यांचा आवाज आणि गाण्याचे बोल लोकांना आवडू लागले. पुढे ते आंबेडकरी जलशांमध्ये गाऊ लागले. विशेषतः ज्या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण असे त्याठिकाणी बाबासाहेबांच्या भाषणाआधी वामनदादांचे गाणे होत असे. बाबासाहेबांनी त्यांच्या गाण्याची स्तुती अनेकवेळा आपल्या भाषणांमधून केली आहे. बाबासाहेब म्हणत माझ्या दहा भाषणांचं काम शाहिरांचं एक गाणे करते. वामनदादांचे बहुतांश गीते हे लोकगीते आहेत. वामनदादांची गीते म्हणजे कोंडलेल्या मनाचा हुंकार. वामन दादांच्या गीतांचा केंद्रबिंदू हा मानव होता म्हणूनच वामनदादा म्हणतात मानवा इथे मी तुझे गीत गावे.... तुझे गीत व्हावे मानवता. आंबेडकर भक्ती, दलित, शोषित, स्त्रीमुक्ती, जातीव्यवस्था यावर वामन दादांनी आपल्या गीतातून प्रबोधन केले. दादांनी आपल्या गीतातून हुंडाबळी, ऊसतोड कामगार, पर्यावरण, कामगार, शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळ यावरही भाष्य केले. त्यांच्या गीतांचे प्रेरणास्थान डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच होते. वामन दादांनी स्वतःला भीमकार्यात वाहून घेतले. दादांनी आपल्या असंख्य लोकगीतांतून लोकांना भुरळ घातली. म्हणूनच ते लोककवी झाले. दादांनी आयुष्यभर आंबेडकरी विचारांची पताका आपल्या खांद्यावर खंबीरपणे वाहिली. आपल्या तेजस्वी लेखणीने आणि कणखर वाणीने फुले, शाहू, आंबेडकर घराघरांत पोहचवणाऱ्या या महाकवीचे १५ मे २००४ रोजी निधन झाले. लोककवी वामन दादा कर्डक यांना २२ व्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

पान १ वरुन

### सात दिवसांत ...

अंबड चौफुली आणि घाटी रोड परिसरातील दुकाने हटवली. काही ठिकाणी दुकानधारकांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला असला तरी प्रशासनाने पोलीस बंदोबस्ताच्या सहाय्याने कारवाई पूर्ण केली.

ही मोहीम मनपा आयुक्त अंजली शर्मा यांच्या आदेशानुसार राबविण्यात येत असून, उपायुक्त त्र्यंबक कांबळे आणि सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर यांच्या थेट मार्गदर्शनाखाली कारवाई केली जात आहे. आजच्या मोहिमेत अतिक्रमण विभाग प्रमुख बी. सी. राठोड, सहाय्यक प्रमुख सॅमसन कसबे, स्वच्छता विभाग प्रमुख निलेश शंकरपेली तसेच स्वच्छता निरीक्षकांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून कारवाईचे नेतृत्व केले.

कायद्याचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. कारवाईसाठी १ जेसीबी, २ टिप्पर आणि ट्रॅक्टरचा वापर करण्यात आला. अनधिकृत शेड, ओटे आणि बांधकामे काही मिनिटांत जमीनदोस्त करण्यात आली. मनपाच्या या आक्रमक भूमिकेमुळे अतिक्रमणधारकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अनेकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढण्यास सुरुवात केल्याचे चित्र दिसत आहे.

दरम्यान, प्रशासनाच्या या मोहिमेला नागरिकांकडून मिश्र प्रतिक्रिया मिळत आहेत. वाहतूक कोंडी कमी होणे, रस्ते मोकळे होणे आणि स्वच्छता सुधारण्याच्या दृष्टीने अनेक नागरिकांनी कारवाईचे स्वागत केले आहे. तर काही व्यापाऱ्यांनी पुनर्वसनाचा प्रश्न उपस्थित करत प्रशासनाने पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली आहे.

मनपा प्रशासनाने मात्र स्पष्ट संकेत दिले आहेत की, शहरातील अतिक्रमणांविरोधातील ही मोहीम आगामी काळातही अधिक तीव्रतेने सुरू राहणार आहे. मुख्य रस्ते, बाजारपेठा आणि सार्वजनिक जागांवरील अनधिकृत बांधकामांविरोधात कोणतीही दया दाखवली जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### १०२ मॉडीफाईड ...

आवाजामुळे होणारे ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी शहर वाहतूक शाखा आणि शहरातील चारही पोलीस ठाण्यांना संयुक्त आणि प्रभावी अंमलबजावणीचे निर्देश दिले होते.

त्यानुसार, मागील दोन वर्षांत राबविलेल्या विशेष मोहिमेत वाहतूक पोलिसांनी अशा १०२ बुलेट चालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कडक दंडात्मक कारवाई केली होती. केवळ दंड न आकारता, पोलिसांनी या सर्व बुलेटचे बेकायदेशीर सायलेन्सर्स जागेवरच काढून जप्त केले होते. आज त्या सर्व जप्त सायलेन्सर्सचा प्रशासनाने कायदेशीर रित्या कचरा केला.

ध्वनीप्रदूषणामुळे ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुले होते त्रस्त बुलेटच्या या मॉडीफाईड आवाजामुळे शहरातील सर्वसामान्य नागरिक प्रचंड त्रस्त झाले होते. पोलिसांच्या या कारवाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की:

हृदयविकाराचा धोका आणि ज्येष्ठ नागरिक: रस्त्यावरून अचानक जाणाऱ्या बुलेटमधून जेव्हा फटाक्यासारखा मोठा आवाज (सायलेन्सर ब्लास्ट) काढला जातो, तेव्हा गल्लीबोळातील किंवा रस्त्यावरील ज्येष्ठ नागरिकांच्या छातीत धडकी भरत असे. हृदयविकार असलेल्या वृद्धांसाठी हा आवाज अत्यंत जीवघेणा ठरत होता.

लहान मुलांच्या कानावर आणि अभ्यासावर परिणाम: घरात शांतपणे झोपलेली लहान मुले या आवाजाने दचकून जागी व्हायची आणि रडायला लागायची. विद्यार्थ्यांच्या अभ्यासातही यामुळे मोठा व्यत्यय येत होता.

श्रवणशक्तीला इजा: कर्णकर्कश आवाजामुळे नागरिकांच्या श्रवणशक्तीवर (कानावर) गंभीर विपरीत परिणाम होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. त्यामुळेच आज जेव्हा पोलिसांनी या सायलेन्सर्सवर रोलर फिरवला, तेव्हा नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडत पोलिसांचे जाहीर आभार मानले.

या पथकाने पार पाडली कामगिरी

ही धडक कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू आणि उपविभागीय पोलीस अधिकारी () श्री. अनंत कुलकर्णी यांच्या थेट मार्गदर्शनाखाली पार पडली.

प्रत्यक्ष कारवाईच्या मैदानात शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश उनवणे, पोलीस उपनिरीक्षक घोरपडे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संजय मगरे, पोलीस हवालदार कचरू गवते, नंदकिशोर कामे, शिवाजी उबाळे, प्रदीप झरेकर आणि रघुनाथ अंभोरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

पोलिसांचा कडक इशारा: मोहीम यापुढेही सुरूच राहणार!

जालना शहर वाहतूक शाखेच्या वतीने बुलेट चालकांना आणि गॅरेज चालकांनाही कडक इशारा देण्यात आला आहे. ''जालना शहरात सायलेन्सर बदलून ध्वनीप्रदूषण करणाऱ्यांविरोधात ही संयुक्त मोहीम इथेच थांबणार नाही, तर वरिष्ठांच्या आदेशानुसार यापुढेही अधिक तीव्र गतीने राबविण्यात येईल. त्यामुळे सर्व वाहनधारकांनी मोटार वाहन कायद्याचे काटेकोर पालन करावे, अन्यथा वाहने जप्त करून थेट फौजदारी कारवाईला सामोरे जावे लागेल,'' असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# डॉक्टरच्या मृत्यूनंतरही वारसदार वैद्यकीय निष्काळजीपणासाठी जबाबदार

## सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

**जालना । प्रतिनिधी -** वैद्यकीय निष्काळजीपणाच्या दाव्यांमध्ये एक दूरगामी परिणाम करणारा निकाल देताना, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, एखाद्या डॉक्टरचा खटला चालू असताना मृत्यू झाल्यास, त्याचे कायदेशीर वारसदार ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत सुरू असलेल्या कार्यवाहीत प्रतिवादी म्हणून सामील होऊ शकतात. तथापि, डॉक्टरांच्या कथित निष्काळजीपणामुळे उद्भवणारी नुकसान भरपाईची त्यांची जबाबदारी केवळ मृत डॉक्टरकडून वारसा हक्काने मिळालेल्या मालमत्तेच्या मर्यादिपर्यंतच असेल. या निकालामुळे पीडित रुग्णांना न्याय मिळण्याच्या प्रक्रियेतील एक मोठी कायदेशीर अडचण दूर झाली आहे.

हे प्रकरण एका वैद्यकीय निष्काळजीपणाच्या तक्रारीतून उद्भवले होते, ज्यात एका रुग्णाने डॉक्टरवर सेवेत त्रुटी असल्याचा आरोप करत नुकसान भरपाईची मागणी केली होती. राज्य ग्राहक आयोगाने डॉक्टरच्या बाजूने निकाल दिला होता. या निर्णयाविरोधात रुग्णाने राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगाकडे धाव घेतली. राष्ट्रीय आयोगासमोर प्रकरण प्रलंबित असतानाच संबंधित डॉक्टरचा मृत्यू झाला. त्यामुळे, रुग्णाने मृत डॉक्टरच्या जागी त्याचे कायदेशीर वारसदार म्हणून पत्नी आणि मुलाला या प्रकरणात सामील करून घेण्यासाठी अर्ज दाखल केला.

डॉक्टरांच्या वारसांनी यास तीव्र विरोध केला. त्यांनी असा युक्तिवाद केला की, वैद्यकीय निष्काळजीपणाचा दावा हा 'ॲक्टिओ पर्सनॅलिस मॉरिटुर कम पर्सोना' या कायदेशीर तत्त्वानुसार एक वैयक्तिक स्वरूपाचा खटला आहे आणि त्यामुळे आरोपी डॉक्टरच्या मृत्यूनंतर तो आपोआप संपुष्टात येतो. मात्र, राष्ट्रीय आयोगाने त्यांचा युक्तिवाद फेटाळून लावत वारसांना प्रकरणात सामील करून घेण्यास परवानगी दिली. राष्ट्रीय आयोगाच्या याच निर्णयाला वारसांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती अतुल एस. चांदूरकर यांच्या खंडपीठाने राष्ट्रीय आयोगाचा निर्णय कायम ठेवला. न्यायालयाने स्पष्ट केले की, भारतीय उत्तराधिकार कायदा, १९२५ च्या कलम ३०६ नुसार, एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचे खटला चालवण्याचे सर्व हक्क त्याच्या वारसांकडे हस्तांतरित होतात. मात्र, यात वैयक्तिक इजा ( ) ज्यामुळे मृत्यू होत नाही, अशा दाव्यांचा अपवाद आहे. न्यायालयाने असे नमूद केले की, वैद्यकीय निष्काळजीपणामुळे होणारे आर्थिक नुकसान ( ) हे मालमत्तेशी संबंधित असल्याने, असे दावे डॉक्टरच्या मृत्यूनंतरही जिवंत राहतात आणि त्याची भरपाई मृत डॉक्टरच्या मालमत्तेतून केली जाऊ शकते.

ॲड. महेश एस. धन्नावत यांनी या निकालाचे स्वागत करताना म्हटले आहे की, ''हा निकाल वैद्यकीय निष्काळजीपणाच्या प्रकरणांमध्ये पीडितांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अनेकदा आरोपी डॉक्टरचा खटला चालू असताना मृत्यू झाल्यास प्रकरण संपुष्टात येईल की काय, अशी भीती असायची. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, डॉक्टरांच्या वारसांना या प्रकरणात प्रतिवादी बनवता येईल. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, त्यांची जबाबदारी केवळ मृत डॉक्टरांकडून मिळालेल्या मालमत्तेपुरतीच मर्यादित असेल, त्यांच्या वैयक्तिक मालमत्तेला कोणताही धोका नसेल. यामुळे आता डॉक्टरांच्या मृत्यूनंतरही त्यांच्या संपत्तीतून पीडित रुग्णाला नुकसान भरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हा निकाल जुन्या कायदेशीर तत्त्वाला आधुनिक काळात अधिक स्पष्टता देतो आणि ग्राहकांच्या हक्कांना बळकटी देतो.'' सर्वोच्च न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले की, ग्राहक मंचाने प्रथम डॉक्टरचा निष्काळजीपणा सिद्ध झाला आहे की नाही हे ठरवावे आणि त्यानंतर मालमत्तेवर आधारित वसूल करण्यायोग्य दावे आणि डॉक्टरच्या मृत्यूनंतर संपुष्टात येणारे वैयक्तिक दावे यांच्यात फरक करावा. वारसांना मृत डॉक्टरच्या मालमत्तेपलीकडे वैयक्तिकरित्या जबाबदार धरले जाऊ शकत नाही, असेही न्यायालयाने आपल्या निकालात अधोरेखित केले आहे. हा निकाल अशा प्रकरणांमध्ये कायदेशीर वारसांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी एक स्पष्ट दिशा देणारा ठरणार आहे.

# शासनाच्या ऑनलाईन सेवांचा नागरिकांनी लाभ घ्यावा

## महाराजस्व समाधान शिबिरात जिल्हाधिकारी आंचल गोयल यांचे आवाहन



**मुंबई -** शासन नागरिकांसाठी आहे. घरबसल्या शासनाच्या सर्व ऑनलाईन सेवांचा लाभ घेऊन वेळ आणि पैशांची बचत करावी, असे आवाहन मुंबई शहराच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान अंतर्गत आयोजित शेवटच्या शिबिरात त्या बोलत होत्या.

प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिरमध्ये पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या लघु नाट्यगृहात झालेल्या या कार्यक्रमात महसूल विभागासह विविध शासकीय विभागांनी नागरिकांना एकाच छताखाली सेवा पुरवल्या. महाराजस्व अभियान हा केवळ शिबिरापुरता मर्यादित उपक्रम नसून सतत सुरू राहणारी प्रक्रिया आहे. शिबीरे संपल्यानंतरही दाखले वाटप व इतर सेवा नियमित सुरू राहतील, असे जिल्हाधिकारी गोयल यांनी सांगितले.

राज्य शासनाच्या 'आपले सरकार' पोर्टलवर अनेक सेवा उपलब्ध आहेत. नागरिकांनी, विशेषतः तरुण पिढीने, ऑनलाईन अर्ज करून या सेवांचा लाभ घ्यावा. बहुतांश सेवासाठी योग्य कागदपत्रांसह अर्ज केल्यास ठराविक कालमर्यादित प्रमाणपत्र उपलब्ध करणे ही प्रशासनाची कायदेशीर जबाबदारी आहे, असे जिल्हाधिकारी गोयल म्हणाल्या.

विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (एसआयआर) अंतर्गत मतदार यादीतील नावांच्या मॅपिंगबाबत यावेळी जिल्हाधिकारी यांनी घराघरात जाऊन काम करणाऱ्या बीएलओंना सहकार्य करावे, २००२ च्या मतदार यादीतील आपली नोंद शोधून तयार ठेवावी आणि 'वोटर सर्विस पोर्टल ' चा वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी गोयल यांनी उपस्थितांना केले.

महाराजस्व समाधान शिबिरात महसूल विभागासह इतर विविध विभागांच्या स्टॉलवरून नागरिकांना दाखले, प्रमाणपत्रे, योजनांची माहिती आणि लाभ देण्यात आले. यावेळी मुंबई शहर उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) गणेश सांगळे, प्रशांत पानवेकर, महेश हरिश्चंद्रे तहसीलदार राजेश वैष्णव, संकेत यमगर आदी उपस्थित होते. नागरिकांना माहिती देण्यासाठी तसेच सेवा पुरविण्यासाठी येथे जवळपास २८ वेगवेगळ्या विभागाचे स्टॉल्स लावण्यात आले होते. या स्टॉल्सला जवळपास ४५० नागरिकांनी भेट दिली. प्रत्यक्ष लाभ ६७ नागरिकांना तर १२२ नागरिकांना विविध दाखल्यांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. जवळपास ६५० नागरिकांना शिबिराचा लाभ मिळाला.

# माव येथील शेतरस्ता खुला करण्याचे आदेश; महसूल प्रशासनाची कडक पावले

**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यातील मौजे माव पाटोदा येथील शेतशिवारातील वर्षानुवर्षे बंद असलेला पारंपारिक वहिवाटीचा रस्ता खुला करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ मधील कलम ५ च्या तरतुदीनुसार ही कारवाई करण्यात येणार असून, यामुळे संबंधित शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, माव पाटोदा येथील गट नंबर १९४, १९२, १९१ आणि १७१, १७२, १७३ मधील शेतात जाण्यासाठी असलेला पारंपारिक रस्ता काही व्यक्तींकडून अडवण्यात आला होता. याबाबत श्री. नागोराव रावसाहेब मानकर व इतरांनी तहसीलदारांकडे दाद मागितली होती. या प्रकरणावर मे. तहसीलदार परतूर व मा. उपविभागीय अधिकारी परतूर यांनी दिलेल्या निकालानुसार, हा रस्ता खुला करण्याचे आदेश २३/०५/२०२५ रोजीच निर्गमित करण्यात आले होते.

या निकालाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी मंडळ अधिकारी श्रीष्टी यांच्या कार्यालयाने संबंधितांना नोटीस बजावली आहे. या नोटिसीनुसार, दिनांक २० मे २०२६ रोजी सकाळी ११:00 वाजता. प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन अडवलेला रस्ता खुला करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. सदर कार्यवाही दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन आष्टी (ता. परतूर) यांना पुरेसा पोलीस बंदोबस्त पुरवण्याचे पत्रही प्रशासनाकडून देण्यात आले आहे. ''रस्ता खुला करण्याच्या प्रक्रियेवेळी संबंधित गैरहजर राहिल्यास, त्याची सर्वस्व जबाबदारी त्यांच्यावर राहील. तसेच, अंमलबजावणीमध्ये अडथळा आणणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल,'' असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या कारवाईमुळे माव (पाटोदा ) परिसरातील शेतरस्त्यांचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार असून, शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# शासनाचे काम लोकाभिमुख, गतिमान आणि पारदर्शक -महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## मुंबई उपनगर जिल्ह्यातील लाभार्थ्यांना महाराजस्व अभियानांतर्गत विविध विभागामार्फत लाभांचे वितरण

**मुंबई -** राज्य शासनाने लोकाभिमुख, गतिमान आणि पारदर्शक कामकाजाची भावना स्वीकारली असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने सुरू करण्यात आलेल्या महाराजस्व समाधान शिबीर अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना एकाच ठिकाणी महसूल विभागासह संबंधित विभागांच्या विविध योजनांच्या लाभांचे वितरण करण्यात येत असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

मुंबई उपनगर जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाअंतर्गत सहाव्या शिबिराचे आयोजन अंधेरी येथील शहाजीराजे भोसले क्रीडा संकुलात करण्यात आले. यावेळी कौशल्य विकास मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे सह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार हारून खान, आमदार विक्रांत पाटील, स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह महसूल आणि संबंधित विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यापूर्वी ७ आणि १४ मार्च, १० आणि १७ एप्रिल तसेच ८ मे २०२६ रोजी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, महसूल विभागाने नागरिकांच्या हिताचे विविध निर्णय घेतले आहेत. अकृषक कायद्यात सुधारणा केल्याने आता कराची वार्षिक आकारणी रद्द झाली आहे. तुकडेबंदी कायदा रद्द झाल्याने लाखो कुटुंबीयांचे घर कायदेशीर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. व्हर्टिकल सातबारामुळे फ्लॅट धारकांना देखील प्रॉपर्टी कार्ड मिळेल, महसूल विभागामार्फत आधी मोजणी, नंतर नोंदणी आणि त्यानंतर म्युटेशन करण्याचा निर्णय घेतला जाणार आहे. त्यामुळे नोंदणीनंतर होणारे वाद संपुष्टात येतील, असेही ते म्हणाले. लँड टायटलिंग मुळे जागेची संपूर्ण माहिती प्रॉपर्टी कार्ड मध्ये येऊन खरेदी विक्री थेट ऑनलाईन करता येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

सह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी महसूल विभागामार्फत घेतलेल्या विविध निर्णयांमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनात मोठा बदल होत असल्याबद्दल विभागाचे कौतुक केले. महाराजस्व समाधान शिबीर अभियान प्रत्येक तालुका पातळीपर्यंत होत असल्याने नागरिकांना सर्व सेवा एकाच ठिकाणी मिळत असल्याचे ते म्हणाले.

उपनगर जिल्ह्यातील सुमारे पाच हजार कोटींहून अधिकची शर्त भंग झालेली जमीन रिकामी करून घेतल्याबद्दल जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांचे त्यांनी कौतुक केले.

जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी प्रास्ताविकात जिल्हा प्रशासन लोकाभिमुख काम करीत असून महाराजस्व




समाधान शिबिरांच्या माध्यमातून सर्व सेवा गतिशील आणि पारदर्शक पद्धतीने देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे सांगितले.

यावेळी शासनाची जमीन खासगी मालकाच्या ताब्यात जाण्यापासून वाचवल्याबद्दल महसूल मंत्र्यांच्या हस्ते जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

लाभार्थ्यांना यावेळी अधिवास, उत्पन्न, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र, सातबारा उतारा व फेरफार, संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत लाभ, शिधाकार्ड, मिळकत पत्रिका व नक्कल, पंतप्रधान श्रमयोगी मानधन योजना कार्ड, ओळखपत्र तसेच निवडणूक उतारा, तृतीयपंथींना कार्ड, बचतगटांना प्रमाणपत्र याचबरोबर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना सदनिकांचे वितरण करण्यात आले.

# 'गुलक', 'जार' सारखे डिजिटल गोल्ड ॲप्स तात्काळ बंद करा अन्यथा जालन्याच्या बँकेसारखी स्थिती ओढवेल- ॲड. महेश धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्डाने (सेबी) ८ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्धीपत्रक ( .७०/२०२५) जारी करून 'डिजिटल गोल्ड'मधील गुंतवणुकीच्या धोक्यांविषयी गंभीर इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर, सुप्रसिद्ध कायदेतज्ञ ॲड. महेश धनावत यांनी पंतप्रधान कार्यालयाकडे एक निवेदन सादर करून, 'गुलक' आणि 'जार' यांसारख्या अनियंत्रित डिजिटल गोल्ड ॲप्लिकेशन्सवर तात्काळ बंदी घालण्याची जोरदार मागणी केली आहे. ॲड. धन्नावत यांनी इशारा दिला आहे की, जर आरबीआयने वेळीच कठोर पावले उचलली असती, तर जालना मर्चंट कोऑपरेटिव्ह बँकेच्या ठेवीदारांचे जसे नुकसान झाले, तशीच गंभीर आर्थिक आपत्ती या ॲप्समुळे सामान्य गुंतवणूकदारांवर ओढवू शकते.

ॲड. धन्नावत यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, ''सेबीने स्पष्ट केले आहे की हे डिजिटल गोल्ड प्लॅटफॉर्म त्यांच्या नियामक कक्षेच्या पूर्णपणे बाहेर आहेत. याचा थेट अर्थ असा आहे की, या ॲप्समध्ये गुंतवणूक करणाऱ्या कोट्यवधी नागरिकांना सिक्युरिटीज कायद्यांतर्गत कोणतेही गुंतवणूकदार संरक्षण कवच उपलब्ध नाही. जर हे प्लॅटफॉर्म आर्थिक संकटात सापडले किंवा बंद पडले, तर सामान्य गुंतवणूकदारांचे हजारो कोटी रुपये बुडण्याचा धोका आहे आणि त्यांना दाद मागण्यासाठी कोणतीही स्थापित कायदेशीर यंत्रणा उपलब्ध नाही.''

जालना मर्चंट कोऑपरेटिव्ह बँकेच्या संकटाचा दाखला देत ॲड. धन्नावत यांनी नियामक दिरंगाईच्या धोक्यावर बोट ठेवले. ते म्हणाले, ''जालना मर्चंट बँकेवर आरबीआयने यापूर्वी जुलै २०२५ मध्ये नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल दंड ठोठावला होता आणि नंतर बँकेची आर्थिक स्थिती बिघडल्याने ठेवीदारांना पैसे काढण्यावर निर्बंध घालावे लागले. आरबीआयने वेळीच अधिक कठोर कारवाई केली असती, तर सामान्य नागरिकांची आर्थिक कोंडी टाळता आली असती. आज तीच परिस्थिती डिजिटल गोल्ड ॲप्सच्या बाबतीत निर्माण झाली आहे. सेबीने धोक्याची सूचना दिली आहे, पण केवळ सूचनेवर थांबून चालणार नाही. सरकारने जालना बँकेच्या प्रकरणातून धडा घेऊन या अनियंत्रित ॲप्सवर तात्काळ बंदी घातली पाहिजे, अन्यथा सामान्य गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान अटळ आहे.''

सेबीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, डिजिटल गोल्ड उत्पादने ही सिक्युरिटीज म्हणून अधिसूचित नाहीत किंवा कमोडिटी डेरिव्हेटिव्ह म्हणून नियंत्रित नाहीत. त्यामुळे गुंतवणूकदारांना महत्त्वपूर्ण काउंटरपार्टी आणि ऑपरेशनल जोखमींचा सामना करावा लागतो. 'गुलक' आणि 'जार' सारखे ॲप्स आक्रमक विपणन करून लहान गुंतवणूकदारांना आकर्षित करत आहेत, परंतु त्यांच्या कामकाजावर कोणाचेही नियंत्रण नाही.

ॲड. धन्नावत यांनी पंतप्रधानांना आवाहन केले आहे की, ''सामान्य आणि लहान गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करणे हे सरकारचे प्रथम कर्तव्य आहे. सेबीने गोल्ड ईटीएफ आणि इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसीट्स सारखे सुरक्षित व नियंत्रित गुंतवणुकीचे पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे, फसवणुकीची शक्यता असलेल्या अनियंत्रित डिजिटल गोल्ड ॲप्सवर त्वरित कारवाई करून त्यांना बंद करण्याचे निर्देश द्यावेत.''

# अंगाई-युनिसेफ च्या मोहिमेमुळे आंबेवाडी गाव बालविवाहमुक्त

## जनजागृती मोहिमेला गावकऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद

**मुंबई -** बालविवाह मुक्तीकडे वाटचाल करत राज्य शासनाच्या सहकाऱ्याने 'अंगाई-युनिसेफ'ने धाराशिव जिल्ह्यातील आंबेवाडी गावात जनजागृती मोहीम राबविली. या मोहिमेला प्रतिसाद देत गेल्या दोन वर्षापासून आंबेवाडी गावात एकही बालविवाह झाला नसल्याची माहिती युनिसेफने पत्रकाद्वारे दिली आहे.

गावाने बालविवाहा विरोधात एक सकारात्मक आणि प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. सलग दोन वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या 'उत्सव समतेचा' आणि 'मीना राजू मंच' या अभियानांमुळे गावात सामाजिक परिवर्तन घडताना दिसत आहे. अंगाई-युनिसेफ यांच्या सहकार्याने धाराशिव जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या या उपक्रमात १२० शाळा, ८०० हून अधिक शिक्षक आणि सुमारे १८ हजार विद्यार्थी सहभागी झाले आहेत. स्वयं शिक्षण प्रयोग (एसएसपी), कोरो आणि मावा या स्थानिक संस्थांनीही अभियानाला सक्रिय सहकार्य केले.

गावात आयोजित 'उत्सव समतेचा' कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी ढोल-ताशे, लेझीम, गीते आणि घोषणांच्या माध्यमातून बालविवाह, लैंगिक भेदभाव आणि मुलींच्या शिक्षणाबाबत व्यापक जनजागृती केली. 'बालविवाह बंद करा' आणि 'मुलींना शिक्षण द्या' अशा घोषणांसह विद्यार्थ्यांनी संपूर्ण गावातून रॅली काढून नागरिकांना जागृत केले.

मंदिर परिसरात गावातील नागरिकांनी बालविवाह रोखण्याची आणि प्रत्येक मुलीला शिक्षणाची संधी देण्याची सामूहिक शपथ घेतली. 'माझं लग्न लहान वयात झालं होतं, पण माझ्या नातीला तसं आयुष्य देणार नाही,'' असे गावातील महिला आश्वासित करताना दिसत आहेत. शाळांमध्ये आयोजित नाटक, भाषण, वादविवाद आणि भूमिका परिवर्तन यासारख्या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांनी स्त्री-पुरुष समानतेचा संदेश दिला. इयत्ता आठवीतील समीक्षा हिने, ''आता मुलं स्वयंपाक करतात आणि मुली फुटबॉल खेळतात. माझं कुटुंब माझ्या समानता आणि शिक्षणाचा संदेश आता गावाच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनत आहे असे विश्वासाने सांगितल्याची माहिती युनिसेफने दिली.



**जालना तालुक्यातील मौजपुरी येथे स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी राजे भोसले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी सामाजिक कार्यकर्ते भागवत बळप, विष्णुपंत गायकवाड, भागवत बारड, रामदास गायकवाड, अनिल काळे, गणेश डोंगरे,संजय मोरे, विजय मालुसरे, गोवर्धन डोंगरे, गजानन मोहिते, राहुल मालुसरे,बाळु बारड, गजानन रामाने यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# दोन वर्षांपासून बेपत्ता असलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध

## जालना अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष पथकाची कोल्हापुरात मोठी कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** लग्नाचे आमीष दाखवून पळवून नेलेल्या एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचा शोध लावण्यात जालना पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला यश आले आहे. गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेला हा तपास तडीस नेऊन, पोलिसांनी आरोपीला कोल्हापूर जिल्ह्यातून ताब्यात घेतले असून पीडित मुलीची सुटका केली आहे.

नेमकी घटना काय होती?

तीर्थपुरी पोलीस ठाणे (ता. घनसावंगी) येथे १८ मार्च २०२४ रोजी भादवी कलम ३६३ (अपहरण) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादीनुसार, त्यांच्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस गजानन रावसाहेब वानखेडे (वय २५ वर्षे, रा. तीर्थपुरी) याने लग्नाचे आमीष दाखवून फूस लावून पळवून नेले होते. या घटनेला दोन वर्षांचा कालावधी उलटूनही आरोपी आणि पीडित मुलगी मिळून येत नसल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण होते.

तपासाला मिळाली गती

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता, पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार ८ जानेवारी २०२५ रोजी या प्रकरणाचा तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष (), जालना यांच्याकडे वर्ग करण्यात आला. पथकाने तातडीने सूत्रे हलवत तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे फिरवली.

कोल्हापुरातून आरोपीला बेड्या

तपासादरम्यान पोलीस पथकाला माहिती मिळाली की, आरोपी गजानन वानखेडे हा कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोली (ता. हातकणंगले) येथे आपली ओळख लपवून वास्तव्यास आहे. मिळालेल्या माहितीची खातरजमा करून जालना पोलिसांच्या पथकाने कोल्हापूर गाठले. तिथे सापळा रचून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आणि पीडित मुलीची सुटका करण्यात आली. पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी दोघांनाही तीर्थपुरी पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

या पथकाने बजावली कामगिरी

सदरची यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. तेघवीर सिंह संधु, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

विशेष पथकातील सहभागी अधिकारी व अंमलदार:

प्रभारी अधिकारी: पोउपनि गणेश शिंदे

सहकारी अधिकारी: पोउपनि रविंद्र जोशी, पोउपनि संजय गवळी अंमलदार: पोहेकों सागर बावीस्कर, महिला अंमलदार पुष्पा खरटमल, संगिता चव्हाण, आरती साबळे, रेणुका राठोड.

चालक: संजय कुलकर्णी.



दोन वर्षांपासून प्रलंबित असलेला हा गुन्हा उघडकीस आणल्याबद्दल पीडित कुटुंबाने जालना पोलिसांचे आभार मानले आहेत.

# स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांचा सत्कार

**दत्ता देशमुख**

**जाफराबाद -** स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पंत संस्था मर्यादित जफराबाद शाखा यांच्या वतीने समर्थ विद्यालय जाफराबाद १0वीं एसएससी बोर्ड परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी चे पुष्प गुच्छ देवृन स्वागत करनेयात आले आहे

दीपक शिंदे बॅक मॅनेजर, अमोल परदेसी , प्रीती हरपाळकर जोशी

सुमित दादाराव खंडागळे ८१.२0

दिपाली शिवाजी मापारी ७९.४0

राज भागवत सोनवणे ७८.६0

गणेश विष्णू कणखर ७५.२0

समर्थ विद्यालय डॉक्टर विद्यार्थी



सचिव संजयजी गौतम, मनीषाताई पडघन, सुतार सर, लोखंडे सर ,सवडे सर, पंडित सर, खेडेकर सर आदींची उपस्थिती होती.

## भारतीय सशस्त्र दलातील अधिकारी पदासाठी मोफत पूर्व प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**जालना -** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी इच्छुक युवक-युवतींसाठी महाराष्ट्र शासनातर्फे छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे () परीक्षा पूर्व प्रशिक्षण कोर्स क्र. ६७ आयोजित करण्यात आला आहे. हा प्रशिक्षण वर्ग दि. १५ जून २०२६ ते २८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत होणार असून निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींनी दि. १४ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रात उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या कोर्सदरम्यान प्रशिक्षणार्थींना मोफत प्रशिक्षणासोबत निवास व भोजनाचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जालना जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी दि. ४ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे मुलाखतीस उपस्थित राहावे. मुलाखतीस येताना उमेदवारांनी संकेतस्थळावरील प्रवेशपत्र व संबंधित परिशिष्टांची प्रिंट काढून ती पूर्ण भरून सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातूनही प्रवेशपत्र उपलब्ध करून दिले जाणार आहे. सदर प्रशिक्षण वर्गासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक असून त्यांनी लोकसेवा आयोग नवी दिल्ली यांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज केलेला असावा.

# संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या विविध योजनासाठी कर्ज प्रस्ताव दाखल करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** संत रोहिदास चर्मोउदयोग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित यांच्यामार्फत अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील (चांभार,मोची,ढोर होलार) इ. व्यक्तींचा शैक्षणिक व सामाजिक विकास होण्यासाठी आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये विविध योजना राबविल्या जाणार आहेत. इच्छुकांकडून कर्ज प्रस्ताव दि.११ जून पर्यंत मागविण्यात आले आहेत.

महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या ५0 टक्के अनुदान योजनेसाठी ४१, बीजभांडवल योजनेसाठी २0 असे एकूण ६१ लाभार्थ्यांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

निकषः- अर्जदार हा चर्मकार (चांभार, मोची, ढोर, व होलार) इ. समाजातील असावा. अर्जदाराचे वय १८ ते ५0 वर्ष इतके असावे. अर्जदाराने यापुर्वी महामंडळाच्या कुठल्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदाराने आवश्यकतेनुसार स्वतः अर्जदाराने मुळ कागदपत्रासह उपस्थित राहून कर्ज प्रस्ताव दाखल करावेत. त्रयस्थ/ मध्यस्थांमार्फत कर्ज प्रकरणांचे अर्ज देण्यात अथवा स्वीकारण्यात येणार नाही.

आवश्यक कागदपत्रेः- जातीचा दाखला, चालु वर्षाचा उत्पन्नाचा दाखला,रेशन कार्ड,रहिवासी दाखला,मतदान ओळखपत्र, आधारकार्ड,पॅन कार्ड,शैक्षणिक दाखला, तीन फोटो, उद्योग आधार, सीबील क्रेडिट स्कोर (५00 च्या पुढे असावा),ज्याठिकाणी व्यवसाय करावयाचा आहे त्या जागेचा पुरावा, वीज बील/ टॅक्स पावती /भाडे करारनामा/भाडे पावती/ जागा वापर संमती पत्र किंवा मालकी हक्काचा पुरावा,कागदपत्रे खरी असल्याबाबत लाभार्थ्याचा विनंती अर्ज व ज्या जागी व्यवसाय चालु आहे त्याच जागेचे प्रमाणित छायाचित्र, एक सक्षम जामिनदार (नोकरदार/मालमत्ताधारक/ शेतकरी),जामिनदाराचे हमीपत्र, ग्रामपंचायत, महानगरपालिका अथवा नगरपालिका यांचे ना हरकत प्रमाणपत्र, व्यवसायासंबंधी तांत्रीक प्रमाणपत्र, अनुभवाचा दाखला, प्रकल्प अहवाल (सीए यांच्या सही शिक्क्यानिशी),खरेदी करावयाच्या साहित्याचे जीएसटी क्रमांक असलेले दरपत्रक,अर्जदाराचे वारसदाराच्या स्वाक्षरीसह नामांकन शपथपत्र, विहित नमुन्यातील शपथपत्र, विवाहित स्त्री असल्यास लग्नापुर्वीचे व लग्नानंतरच्या दोन्ही नावाची व्यक्ती हि एकच असल्याबाबतचे शपथपत्र, लाभार्थ्याचा आधार कार्ड क्रमांक व आधार संलग्न बँक खाते क्रमांक असलेल्या पासबुकची छायांकीत प्रत.

ज्या लाभार्थ्यांना योजनांचा लाभ घेऊन व्यवसायासाठी कर्ज घ्यावयाचे असेल अशा इच्छुकांनी आपले कर्ज प्रस्ताव दि. ११ जून पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, इमारत क्र. ३. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जालना येथे सादर करावेत. गरजू लाभार्थ्यांनी महामंडळाच्या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक अरुण सी. राऊत यांनी केले आहे.

# आसाम ते जालना 'लव्ह ट्रॅप'चा धक्कादायक प्रवास; दोन मुलींची सुटका, एक आरोपी जेरबंद..

## रडणाऱ्या मुलींमुळे उलगडला मोठा प्रकार; जालना स्टेशनवरून दोघींची सुटका

**जालना । प्रतिनिधी** - आसाम राज्यातील आनंदनगर येथून तब्बल १५ दिवसांपासून बेपत्ता असलेल्या दोन अल्पवयीन मुली अखेर जालना रेल्वे स्थानकावर आढळून आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणात पोलिसांनी एका २१ वर्षीय तरुणाला ताब्यात घेतले असून, त्याने प्रेमाच्या जाळ्यात अडकवून मुलींना फूस लावून आणल्याचा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. सध्या या संपूर्ण प्रकरणाचा जालना पोलीस सखोल तपास करत आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, आसाममधील आनंदनगर येथील दोन अल्पवयीन मुली अचानक बेपत्ता झाल्या होत्या. याप्रकरणी त्यांच्या कुटुंबीयांनी स्थानिक पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावर दोन मुली आणि एक तरुण रेल्वेत चढत असताना मुली घाबरलेल्या व रडत असल्याचे काही प्रवाशांच्या लक्षात आले. यानंतर ही माहिती जालना गौरक्षक दलाला देण्यात आली.

माहिती मिळताच गौरक्षक दलातील राहुल वर्तले, रोहित जाधव, दत्ता पवार, युवराज राठोड, कैलास मांगडे, अमोल शिंदे, अमोल सावंत आणि यश गहेराव यांनी तातडीने हालचाली सुरू केल्या. त्यांनी तत्काळ जालना पोलीस अधीक्षकांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी जालना रेल्वे स्थानकावर बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांसोबत सापळा रचत कारवाई केली.

या कारवाईदरम्यान दोन अल्पवयीन मुलींसह राहुल मेहंदी (वय २१, रा. आसाम) या तरुणाला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी मुलींकडे चौकशी केली असता, संबंधित तरुणाने प्रेमाच्या आमिषाने त्यांना फूस लावून घराबाहेर काढल्याची माहिती समोर आली आहे.

घटनेनंतर पोलिसांनी दोन्ही मुलींना बालकल्याण समितीकडे सुपूर्द केले असून समितीच्या आदेशानुसार त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी महिला रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. तर ताब्यात घेतलेल्या तरुणाची कसून चौकशी सुरू असून, या प्रकरणामागे मानवी तस्करी, फूस लावणे किंवा अन्य कोणते मोठे रॅकेट आहे का, याचाही तपास पोलीस करत आहेत.

राहुल वर्तले हे नेहमीच सामाजिक कार्यात सक्रिय राहून समाजहिताच्या प्रश्नांवर आक्रमकपणे आवाज उठवत असतात.

गवतस्करी, अवैध मांस विक्रीसारख्या बेकायदेशीर प्रकारांना आळा घालण्यासाठी ते सतत तत्पर राहून प्रशासनालाही सहकार्य करत आहेत. आजराहुल वर्तले यांच्या सहकार्यामुळे पोलिसांनी दोन्ही मुलींना ताब्यात घेण्यात पोलिसांना मदत केली

या घटनेमुळे जालना रेल्वे स्थानक परिसरात एकच खळबळ उडाली असून, अल्पवयीन मुलींना लक्ष्य करणाऱ्या टोळ्यांविरोधात कठोर कारवाईची मागणी गौरक्षक दलाच्या वतीने करण्यात आली

# जाफराबाद येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान संपन्न



**दत्ता देशमुख**

**जाफ्राबाद -** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्वं अभियान अंतर्गत समाधान शिबीर दिनांक १३/०५/२०२६ रोजी सकाळी ठिक ९.३0 वाजता नगर पंचायत जाफ्राबाद व तहसिल कार्यालय जाफ्राबाद यांचे सौजन्याने नगर पंचायत जाफ्राबादच्या समोरील मैदानात आयोजित करण्यात आले होते सदरील कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती व कार्यक्रमाचे उदघाटक मा.आ.श्री. संतोष पाटील दानवे (अध्यक्ष पंचायत राज समिती महाराष्ट्र राज्यं) यांचे हस्ते कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले.

तसेच कार्यक्रमासाठी उपस्थितामध्ये मा.श्री.बी. सरवनन उपविभागीय अधिकारी भोकरदन मा.श्री अविनाश लोढे तहसिलदार तहसिल कार्यालय जाफ्राबाद जाफ्राबाद नगर पंचायतच्या नगराध्यक्षा सौ. कविता दिपक वाकडे उपनगराध्यक्ष शेख रऊफ शेख रहीम इ सर्व सन्माननीय नगरसेवक व नगरसेविका तसेच नगर पंचायत जाफ्राबादचे मुख्याधिकारी श्री. सुरज पांडुरंग बिस्कीटे हे उपस्थित होते नगर पंचायत जाफ्राबादचे मुख्याधिकारी श्री. सुरज पांडुरंग बिस्कीटे यांनी नागरीकांना शासकीय जमीनीवरील निवासी अतिक्रमने नियमीत करण्याबाबत माहिती देऊन सुचना दिल्या नगर पंचायतीमार्फत देण्यात येणारे सुविधा १.0 व २.0 बांधकाम परवाणगी व चावी वाटप, दिव्यांग निधी वितरन, ब्युटी पार्लर प्रशिक्षण आदेश वाटप, निधि वाटप तथा नोंदनी, रमाई आवास योजना निधी वाटप तथा नोंदनी या बाबत नागरीकांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले तथा तहसिल कार्यालय जाफ्राबाद मार्फतदेण्यात येणाऱ्या सुविधामध्ये सातबारा, उत्पन्नं प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र व इत्यादी प्रमाणपत्रे मा.श्री अविनाश लोढे तहसिलदार तहसिल कार्यालय जाफ्राबाद यांनी नागरीकांना वाटप केले व इतर सुविधा बाबत माहिती दिली. तसेच या कार्यक्रमामध्ये उपस्थित नगर पंचायत जाफ्राबादचे कार्यालयीन अधिक्षक, श्री. प्रविण वायाळ, कर व प्रशासकीय अधिकारी श्री. भुषण पळसपगार पा.पु.अ.श्री. संतोष हिवाळे, श्री. धिरज गोफणे लिपीक, श्री. रिजवान पठाण लिपीक श्री. रावसाहेब इच्चे लिपीक प्रदिप राऊत अक्षय वाकडे, अनिल वाघ, अजय सोनसाळे कांतीलाल बन्सवाल दिलीप मगरे तसेच श्री.शे आवेज शे. नुर व तहसिल कार्यालयीन कर्मचारी, व इत्यादी नगर पंचायत कर्मचारी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.